ISBN : 978-81-926888-5-5

Gokhale Education Society's
R. N. Chandak Arts, J. D. Bytco Commerce & N. S. Chandak Science College,
Nashik Road - 422 101
ISO 9001:2008 Certified • E-mail : cbcnashikroadcollege@gmail.com
NAAC reaccredited 'B' Grade • Website : www.cbccollege.in

*Golden Jubilee Celebrations - 23rd Conference*

# PROCEEDINGS

## Two Day National Conference on "The Life and Mission of Namdar Gopal Krishna Gokhale and the Importance and Relevance of his Thoughts in Today's Times"

## नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व आणि उपयुक्तता

on

Monday, 1st & Tuesday, 2nd September 2014

**Chief Editor : Prin. Dr. R. M. Kulkarni**

**Executive Editor : Dr. Anjali A. Gautam**



**Namdar Gopal Krishna Gokhale**

 ISBN : 978-81-926888-5-5


| | | | |
|---|---|---|---|
| **Session - II<br>Sub Theme : G. K. Gokhale's political thoughts and spiritualization of politics** | | | |
| ७ | नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंचे राजकारणाचे आध्यात्मीकरण विषयी विचार व समकालीन प्रस्तुता | प्राचार्य डॉ.जी.एन. चिट्टे, पी. जे. पाटील | ४४ |
| ८ | नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्व आणि उपयुक्तता | डॉ. सुलभा पाटील | ४८ |
| ९ | राजकारणाला अध्यात्माचा परिसस्पर्श करणारा भारतभक्तियोगी | डॉ. बी. एस. मुरादे | ५१ |
| १० | राजकारणाच अध्यात्मिकरण – एक चिंतन | विजया विनायक धनेश्वर | ५५ |
| ११ | गोपाळ कृष्ण गोखले यांचे राजकीय विचार | डॉ. गणेश दत्तात्रय गिरी | ६० |
| १२ | ना. गोखले प्रणित राजकीय अध्यात्मिकरणाची प्रासंगिकता | डॉ. सुनंदा वामनराव ठाकरे | ६४ |
| १३ | गोपाल कृष्ण गोखले : शैक्षिक एवं राजनैतिक विचारधारा | डॉ. सीमा तुकाराम जाधव | ६८ |
| १४ | राजकारणाचे अध्यात्मिकरण आणि त्याची गरज | डॉ. शुभदा रावळ-ठाकरे | ७२ |
| १५ | ना.गोपाळ कृष्ण गोखले यांचे राजकीय विचार | सि. के. तळेकर, डॉ. हनुमंत भूमकर | ७५ |
| १६ | Influence of Gokhale's Political Thoughts On India | Vrushali Nitin Thorat | 80 |
| १७ | राजकारणाचे अध्यात्मिकरण, कायदेशीर राजकारण आणि ना.गोपाळ कृष्ण गोखले यांचे विचार – एक अभ्यास | संदिप बाळासाहेब सातभाई | ८४ |
| १८ | नेमस्त राजकारणी – गोखलेंच्या दृष्टीकोनातून – राजकारणाच्या अध्यात्मीकरणाची आवश्यकता | स्मिता ओंकारराव माळवे | ८९ |
| **Session - III<br>Sub Theme : G. K. Gokhale : An Educationist** | | | |
| १९ | नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्ये | प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी | ९३ |
| २० | Select Thoughts of Namdar Gopal Krishna Gokhale on education | Dr. Mrs. S. T. Aurangabadkar | 96 |







| | |
|---|---|
| २१ | Na |
| २२ | |
| २३ | शि |
| २४ | ना |
| २५ | न |
| २६ | |
| २७ | Dr |
| २८ | |
| २९ | Go |
| ३० | |
| ३१ | |
| Sub Th concepts of | |
| ३२ | |
| ३३ | |
| ३४ | G |
| ३५ | |
| ३६ | |

2014-2015

द्वि-दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र बिटको कॉलेज
दि. 1,2 ऑक्टोबर 2014.

ISBN: 978-81-926888-5-5

**प्रा. स्मिता ओंकारराव माळवे**
मराठी विभाग,
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
नाशिकरोड

## ‘नेमस्त राजकारणी - गोखलेंच्या दृष्टीकोनातून - राजकारणाच्या अध्यात्मीकरणाची आवश्यकता’

उदारमतवादी ना. गोपाळकृष्ण गोखल्यांची राजकीय विचारसरणी पाश्चात्य आदर्श उदारमतवादी तत्वांवर आधारलेली होती. भारतीय राजकारणात क्रांतीकारक व जहाल मार्ग त्यांना मान्य नव्हता. फर्ग्युसनला असतांना त्यांची व रानड्यांची भेट झाली. रानडेंना गोखले गुरू मानत. उपजतच असलेल्या राजकारणाच्या गोडीला व्यासंगाची जोड मिळाली. आणि पुढे रानड्यांनी तिला निश्चित दिशा दिली. पुढे १८९५ साली सार्वजनिक सभा टिळकांच्या ताब्यात गेली. चिटणीसपदी गोखले होते. सभेच्या कार्यात जास्त वाव नसल्याने १८९६ साली त्यांनी राजीनामा दिला. सार्वजनिक क्षेत्रात कार्य व किर्ती वाढत होती. वाक्चातुर्याने सभा-समेलने व कॉंग्रेस अधिवेशने गोखले गाजवत होते.

डेक्कन सभेमार्फत वेल्बी कमिशनसमोर साक्षीसाठी गोखले विलायतेस गेले. हा त्यांच्या कार्यातील एक महत्वपूर्ण टप्पा होय. ब्रिटिश सरकारचा वारेमाप खर्च, हिंदी प्रजेची आर्थिक अवनती, बहुसंख्य ब्रिटिश नौकर लाचखाऊ, भेदाभेद, उदासीन सरकार यांसारख्या अनेक मुद्यांना सप्रमाण आधार देऊन गोखल्यांनी वेल्बी कमिशनसमोर साक्ष दिली. उपाय सुचवले, दुरूस्त्या सुचवल्या. या साक्षीने ‘उदयोन्मुख लोकाग्रणी’ म्हणून गोखल्यांनी लक्ष वेधले.

- **विचारांतील परखडपणा-**

१८९९ साली मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात टिळक यांना स्पर्धेत मागे टाकून गोखले निवडून आले. प्रतिपाद्य विषयांचा सखोल अभ्यास, बिनकाटेरी, प्रभावी वक्तृत्व यामुळे देशातील कायदेमंडळाच्या इतिहासात त्यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. दुष्काळ निवारण, अबकारी कायद्यातील सरकारधार्जिण्या दुरूस्तीस विरोध, शेतसाऱ्यासंबंधीच्या कायद्याचे शेतकरी-कल्याण-विरोधी स्वरूप इ. विषयांवर अत्यंत परखड विचार त्यांनी सप्रमाण मांडले. शेतसारा कायदा पसार झाला तेव्हा त्यांनी सभात्याग केला. कायदेमंडळ इतिहासातील हा पहिला सभात्याग होय. ‘ब्रिटिश साम्राज्यातील एक विचारवंत मुत्सद्दी’ म्हणून गोखलेंची ओळख निर्माण झाली होती.

२६ मार्च १९०२ रोजी वरिष्ठ कायदेमंडळात केलेल्या पहिल्याच भाषणाने त्यांची किर्ती देशभर पसरली. ज्ञान, निर्भयता, तर्कशुद्ध युक्तीवाद कौशल्य, स्पष्ट व सुबोध प्रतिपादनशैली ही गोखल्यांची वैशिष्ट्ये होत.

1 Jan. 2015 14-15

13 पवार

[redacted]

206



१३. शेती संस्कृतीतील सार्वत्रिक अभावाची नोंद करणारी कविता / ११४
- **डॉ. रणधीर शिंदे**

१४. कृषिसंस्कृतीचा नवा अध्याय मांडणारी कविता / १२०
- **डॉ. पी. विठ्ठल**

१५. 'मायमाती'ने दिला सृजनशीलतेचा संस्कार / १२६
- **डॉ. वेदश्री थिगळे**

१६. माय आणि मातीची सामर्थ्ये उलगडणारे मराठीतील सक्षम काव्य / १३६
- **डॉ. राहुल अशोक पाटील**

१७. मातृत्वाचा जयघोष करणारे काव्य / १५६
- **डॉ. कमल आहेर- कुँवर**

१८. कष्टकरी वेदनेची समृद्ध-संपन्न गाथा - 'भुईशास्त्र' / १६३
- **अजय कांडर**

१९. नव्या मराठी कवितेतील लक्षवेधी कविता / १६६
- **संजय भास्कर जोशी**

२०. ऐश्वर्य पाटेकर यांची कविता : काही नोंदी, काही निरीक्षणे / १७०
- **प्रा.अजय देशपांडे**

२१. मराठी मातीतील अस्सल देशी वाण / १८९
- **डॉ. सुदाम राठोड**

२२. ग्रामीण जगणे आणि आशयाच्या अंगाने समृद्ध 'भुईशास्त्र'/ १९५
- **प्रा. लता पवार**

२३. जगण्याच्या चिखलमातीचं 'भुईशास्त्र' / २०७
- **प्रा. राजेंद्र दुर्योधन मुंढे**

## संपादकीय मनोगत

'ऐश्वर्य पाटेकर आणि भुईशास्त्र...' एकाच नाण्याच्या दोन बाजू. ते जे जगले तेच 'भुईशास्त्र'मध्ये आलेय. त्यातील अस्सलतेमुळे पाटेकरांची कविता मला आवडते. कवी म्हणून चांगली परिचित असणारी ही व्यक्ती मात्र प्रत्यक्ष फारशी न भेटणारी अन् फारशी न बोलणारी आहे. त्यांच्या प्रत्यक्ष भेटी तशा बोटावर मोजण्याइतक्याच झाल्यात. निमित्त; विविध कविसंमेलने किंवा काव्यवाचन स्पर्धेत त्यांची कविता ऐकण्याचं... २००३ साली मी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत त्यांच्या 'मास्तर मास्तर पाटी फुटली' या कवितेला प्रथम पारितोषिक मिळाले आणि कवी म्हणून धडपडणारा, काहीसा अबोल असणारा हा मुलगा पहिल्यांदा भेटला अन् कायमचा लक्षात राहिला. नंतर २००८ साली नाशिकच्या आय. एम. ए. सभागृहात त्यांना अप्रकाशित साहित्यासाठीचा कविवर्य ना. वा. टिळक पुरस्कार स्वीकारताना पाहिले. याच कार्यक्रमात ज्येष्ठ समीक्षक डॉ. रमेश वरखेडे, साहित्यिक-कवी डॉ. फादर दिब्रिटो, प्रा. लता पवार यांनी त्यांच्या कवितेचे केलेले विश्लेषण ऐकले. तोपर्यंत त्यांच्या पाच-सात कविता आणि दोनेक कथांव्यतिरिक्त त्यांचे लेखन मला फारसे माहीत नव्हते. दरम्यानच्या काळात, साहित्य 'क्षेत्रातील काही सहकाऱ्यांकडून ऐश्वर्य पाटेकर यांच्या जगण्या-भोगण्याविषयी आणि त्यांच्या कवितेविषयी माहिती मिळत गेली. त्यांच्या जगण्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी लिहिलेल्या कवितेबद्दलची एक वेगळीच ओढ माझ्या मनात निर्माण झाली. इकडे अधूनमधून वर्तमानपत्रे, नियतकालिके, दिवाळी अंकांतून त्यांच्या वैविध्यपूर्ण कविता वाचायला मिळत होत्या. बऱ्याच उशिराने त्यांच्या कवितांचा संग्रह प्रकाशित होऊन बाजारात आला, तो मला लवकर उपलब्ध होईना म्हणून शेवटी प्रा. नितीन जाधव नावाच्या त्यांच्या एका मित्राकडून तो मिळविला आणि घरी आल्याआल्या अधाशासारखा सलग वाचून टाकला.

पाटेकरयांचे काव्यलेखन म्हणजे केवळ कविता नसून त्यांनी जगलेल्या, भोगलेल्या घटनांचा व्यापक पट आहे. कादंबरीप्रमाणे हा व्यापक पट माझ्या



असते. आयुष्यभर मालकासाठी राबणाऱ्या बैलाचे मनोगत व्यक्त करताना कवी पसायदान मागतो.

"सणासुदीला चंदी दे, औत न सांडवता तुझी शेती
सालोसाल नेटकी करीन !
निकामी होता कत्तलखाना नको, गोठ्यातच मरू दे !
माझं व्याकूळ मरण तुझ्या डोळ्यात भरू दे..."

कष्टाशी इमान राखणारा बैल शेवटी मालकाकडे 'गोठ्यातलं मरण' मागतो. हे मरण मालक डोळ्यासमोर असताना यावे, ही बैलाची माफक अपेक्षा हृदय हेलावून टाकणारी आहे.

'भुईशास्त्र' या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने कवी ऐश्वर्य पाटेकर यांच्या संदर्भात निश्चित विधान करता येते; नव्वदोत्तरी मराठी कवितेत स्वतःची एक वेगळी वाट निर्माण करणारा हा कवी साठोत्तरी ग्रामीण कवितेची संवेदना ओलांडून नवी भूमिका, नवे प्रतिमा-संकेत, नव्या जीवन-जाणिवा, नवे मूल्य प्राप्त करून देण्यात यशस्वी झाला आहे. 'मराठी मातीतील अस्सल देशी वाण' म्हणून या कवीकडे आणि त्याच्या 'भुईशास्त्र' संग्रहाकडे पाहता येते.

•••



## ग्रामीण जगणे आणि आशयाच्या अंगाने समृद्ध भुईशास्त्र

**- प्रा. लता पवार**

॥ १ ॥

कवी ऐश्वर्य पाटेकर यांचा 'भुईशास्त्र' हा पहिलाच कवितासंग्रह आहे. साहित्य अकादमीचा 'युवा साहित्य पुरस्कार'ही या संग्रहाला मिळाला आहे. या कवितासंग्रहात विविध विभाग आहेत. पैकी 'दृष्टांतपाढे' विभागातील पहिल्याच पानावर नांगर-पांभराचे एकत्र चित्र आहे. त्यात नांगराच्या फासाला डोकी अडकलेली आहेत. ती डोकी शेतकऱ्याची आहेत. या चित्रावरूनच 'दृष्टांतपाढे'मधील कवितांचा अंदाज बांधता येतो. शेतकऱ्याच्या संघर्षाचे दृष्टांत या कवितांमधून प्रकटलेले आहेत. व्यवस्था, पर्यावरण, समाज, माणसाचे लुच्चेपण अशा चारही बाजूंनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या जीवनाची व्याकूळ आर्तता येथे प्रकटते. हे दुःख नित्याचेच या अर्थाने 'पाढे' असा शब्द योजण्यात आला आहे.

भुई, शेती, जल, माती यांच्याशी घट्ट नाते जोडणारी ही कविता पोशिंद्यांची नवी गाथा रचताना आपल्या आदिम खुणा जपत भुईच्या शास्त्राची लिखावट करीत जाते. भुई आणि भाकर मिळून 'भूक' या समीकरणाच्या चक्रात शेतकऱ्याची होरपळ चितारणारी ही कविता कोसळणाऱ्या शेतकऱ्याला जगण्याची नवी उमेद देते.

'दृष्टांतपाढे'मधील जास्तीत जास्त कविता शेतकऱ्यांची माणसांकडून झालेल्या फसवणुकीच्या वेदना व्यक्त करणाऱ्या आहेत. तर बाकीच्या कविता बदलत्या पर्यावरणाने शेतीची ढासळती व्यवस्था व्यक्त करणाऱ्या आहेत. पंढरपूरचा विठ्ठल हे शेतकऱ्यांचे आद्यदैवत आहे, संत तुकाराम हा सामान्य माणसाला सर्वांत जवळचा वाटतो कारण तुकारामांच्या भोवतीचा समाज, त्याच्यावर आलेली संकटे सामान्य माणसांशी साम्य दाखविणारी असल्याने संत तुकारामांच्या अभंगात त्याचे प्रतिबिंब सापडते. दुष्काळ पडला, शेतीवाडी, गुरे-ढोरे गेली, व्यवसाय गेला, दिवाळे निघाले, बायका-मुले गेली तरी तुकारामांची विठ्ठलश्रद्धा ढळली नाही. आपल्याभोवतीचे वास्तव-सत्य अभंगातून सांगणाऱ्या तुकारामांना या लोकांनी जगणेही मुश्किल केले होते. ती अवस्था तुकारामांच्या 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ।' या अभंगातून व्यक्त केलेली